पदोन्नतीसाठी निवड होणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी पदोन्नतीबाबत निर्गमित शासन निर्णय/शासन परिपत्रकान्वये दिलेल्या सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करणेबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**शासन परिपत्रक क्र.पदोन्न-२०२६/प्र.क्र.९४/ना.पु.१५**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दि. १५ एप्रिल, २०२६

**संदर्भ :** १) सा.प्र.वि.शासन निर्णय क्र.एसआरव्ही-१०८७-२०१५/प्र.क्र.३०३/का-१२, दि.१२.०९.२०१६
२) सा.प्र.वि. शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/का-१२, दि१.०८.२०१९

**प्रस्तावना :** सा.प्र.वि.च्या संदर्भाधीन क्र. १ येथील शासन निर्णय, दि.१२.०९.२०१६ अन्वये पदोन्नती नाकारल्यामुळे उद्भवणारे परिणाम व त्यासंबंधी अवलंबवावयाची कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. तसेच सा.प्र.वि.च्या संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णय, दि. १.८.२०१९ अन्वये राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देतांना अनुसरावयाच्या कार्यपध्दती बाबतची मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात आली आहेत. तरीही, नियंत्रक, शिधावाटप व पुरवठा यंत्रणेच्या अधिनस्त कार्यालयातील अनेक अधिकारी/कर्मचाऱ्यांनी पदोन्नतीचा कार्यभार स्विकारल्यानंतर पदोन्नती नाकारण्याची बाब निदर्शनास आली आहे. त्यानुषंगाने सदर परिपत्रकान्वये सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन परिपत्रक :**

१) नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई व विभागीय पुरवठा यंत्रणेच्या अधिनस्त कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांना या परिपत्रकान्वये निर्देश देण्यात येत आहे की, सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी उपरोक्त संदर्भ क्र. १ व २ येथील शासन निर्णयान्वये सा.प्र.वि.ने दिलेल्या मागदर्शक सुचनाचे अवलोकन करावे.

२) संदर्भ क्र. २ येथील दि.१.८.२०१९ मधील परिच्छेद १(ओ) शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी पदोन्नती नाकारल्यास अवलंबवावयाची कार्यपध्दतीमध्ये पदोन्नतीचा पदाचा कार्यभार स्विकारण्यापूर्वी पदोन्नती नाकारल्यास दि. १२.०९.२०१६ च्या शासन निर्णयामध्ये नमूद कार्यध्दतीनुसार नियमित निवडसूची/ तदर्थ निवडसूचीमधून नाव वगळण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी व पदोन्नतीचा कार्यभार स्विकारल्यानंतर पदोन्नती नाकारता येणार नाही, अशा स्पष्ट सूचना दिलेल्या आहे.

३) त्यानुषंगाने सर्व अधिकारी/कर्मचारी यांना निर्देश देण्यात येत आहे की, पदोन्नतीसाठी विचारक्षेत्रात असणाऱ्या अधिकाऱ्यांनी पदोन्नती होण्यापूर्वी पदोन्नती निवडसूचीतून नाव वगळणेबाबत किंवा पदोन्नतीचा कार्यभार स्विकारण्यापूर्वी पदोन्नती नाकारण्याबाबत शासनास/संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यास अवगत करावे. **पदोन्नतीचा कार्यभार स्विकारल्यानंतर पदोन्नती नाकारण्याबाबत कोणत्याही अर्ज/विनंतीचा विचार केला जाणार नाही.**

४) सर्व अधिकारी/ कर्मचारी यांनी संदर्भिय शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करण्याची दक्षता घ्यावी.

५) सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२६०४१५१४४९३१६६०६ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

POOJA PRASAD MANKAR

Digitally signed by POOJA PRASAD MANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FOOD CIVIL SUPPLY AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT, 2.5.4.20=2587c101141ff0822d1f39f866ca3537dfc0e52728f89860 4a75ff77b46e7415, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3063036B7F64E995ED6A8BC7C9FBB1A5A10E656 2F73D65107AD668D006B3B164, cn=POOJA PRASAD MANKAR
Date: 2026.04.15 14:51:02 +05'30'

**(पूजा मानकर)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) सर्व जिल्हाधिकारी
२) सर्व विभागीय उपायुक्त (पुरवठा)
३) नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई.
४) नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा व विभागीय पुरवठा यंत्रणेतील सर्व अधिकारी/कर्मचारी.
५) निवडनस्ती(ना.पु.१५)